MHAH020047512022

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३/२०२३**

अलका भाऊसाहेब शेळके वि.
महाराष्ट्र सरकार व इतर

**आदेश निशाणी १ खाली**

१) अर्जदार हिने भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ व ६७/२०१३ मध्ये निकाल देतांना तिच्या नावामध्ये अलका भाऊसाहेब दळवी अशी झालेली चुक दुरुस्त होवुन त्याऐवजी तिचे सदरील निकालांमधील नाव अलका भाऊसाहेब शेळके असे दुरुस्त होवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) अर्जदार कथन करते की, तिने व सामनेवाले नंबर ३ ते १२ यांनी त्यांची शेत जमिन मिळकत अरणगांव येथील शेत जमिन मिळकती अहमदनगर बाह्यवळण रस्त्याकरीता सामनेवाले क्रमांक १ यांनी सामनेवाले क्र २ यांचेकरीता संपादीत केलेल्या होत्या व आहेत. सदर संपादीत क्षेत्राची नुकसान भरपाई मिळणेसाठी अर्जदार व सामनेवाले क्रमांक ३ ते १२ यांनी जादा नुकसान भरपाई मिळणे कामी भुसंपादन कायदा कलम १८ अन्वये अहमदनगर येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर यांचे कोर्टात भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ व ६७/२०१३ दाखल केलेले होते. सदर अर्जांची गुणदोषावर चौकशी होऊन दिनाक १४/०५/२०१६ रोजी अर्जदार व सामनेवाले क्रमांक ३ ते १२ यांचे वर नमुद अर्ज मंजुर करण्यात आलेले आहेत. परंतु, सदरचा निकाल देतांना मा. न्यायालयाकडून निकालपत्र तयार करतांना अर्जदार हिचे नांव अलका भाऊसाहेब शेळके असे असतांना नजर चुकीने अलका भाऊसाहेब दळवी असे नमुद झालेले आहे. वास्तविक पहाता, अर्जदार हिचे मुळ नांव

अलका भाऊसाहेब शेळके असेच होते व आजही आहे. अर्ज दाखल करतांना देखील अलका भाऊसाहेब शेळके असेच अर्जदार हिचे नांव होते व आहे. अशा परिस्थितीत, सदरील अर्जदाराचे नांवामध्ये "अलका भाऊसाहेब दळवी" ऐवजी "अलका भाऊसाहेब शेळके" अशी दुरुस्ती होवून मिळणे न्याय व उचीत आहे. सदरील दुरुस्ती न केल्यास सदरील नुकसान भरपाईची रक्कम अर्जदार व सामनेवाले क्रमांक ३ ते १२ यांना मिळणे कामी अडचणी निर्माण होतील व त्यामुळे अर्जदार व सामनेवाले क्रमांक ३ ते १२ यांचे कशीही व कशानेही भरुन येणार नाही असे अपरिमीत नुकसान होईल. अर्जदार यांना रक्कम मिळणे कामी सदरील न्यायनिर्णयातील चुकीमुळे अडचणी निर्माण झाल्या व त्या होत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे आवश्यक आहे.

**३)** येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, सामनेवाला क्र. १ व २ यांचे विरुध्द प्रस्तुत न्यायालयाचे पुर्वाधिकारीयांनी दिनांक १८/३/२०२४ रोजी '' म्हणणे नाहीचा '' आदेश पारित केलेला आहे. तसेच सामनेवाला क्र. ३ ते १२ यांनी निशाणी क्र. १४ वर पुरसीस दाखल करुन सदरील अर्जास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे कळविले आहे.

**४)** अर्जदार हिने तिच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ कागदयादी निशाणी क्र. ३/१ वर भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ६६/२०१३ व ६७/२०१३ मधील न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत हजर केलेली आहे. तसेच अर्जदार हिने निशाणी क्र. २२ वरील कागदयादी सोबत अनु क्रमांक १ व २ वर भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ व भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६७/२०१३ मधील निशाणी क्र. १ वरील अर्जांच्या प्रमाणित प्रती हजर केलेल्या आहेत.

५)  अर्जदारकरीता विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६)  येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, वर नमुद भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ व भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६७/२०१३ च्या कागदयादी निशाणी क्र. ३/१ वरील संयुक्त न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता दिनांक २४/०५/२०१६ रोजी सदरील अर्जांवर न्यायनिर्णय पारित होवुन त्यामधील संयुक्त अर्ज अंशत: मंजूर करण्यात आल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुतच्या भुसंपादन निर्देशन अर्जांवर दिनांक १४/०५/२०१६ रोजी कोणताही न्यायनिर्णय झाला नसल्याचे स्पष्ट होते. तसेच निशाणी क्र.२२/१ वरील भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ मधील निशाणी क्र. १ च्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदार क्र. ४ड म्हणून अलका भाऊसाहेब दळवी, वय – सज्ञान, असे नमुद असल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत अर्जदार हिने तिचे वर नमुद भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ च्या मुळ अर्जामध्येच स्वत:चे नाव अलका भाऊसाहेब दळवी असे नमुद केल्याचे दिसुन येते. त्यामुळे भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ निशाणी क्रमांक ३/१ वर दाखल दिनांक २४/०५/२०१६ च्या संयुक्त न्यायनिर्णयामध्ये प्रस्तुत प्रकरणामधील अर्जदार हिचे नाव अलका भाऊसाहेब दळवी असे प्रस्तुत न्यायालयाचे पुर्वाधिकारी यांनी नमुद केल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत न्यायालयाचे संयुक्त अर्जांवरील भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६६/२०१३ वर न्यायनिर्णय पारित करतेवेळेस अर्जदार हिचे नाव अलका भाऊसाहेब शेळके असे असतांना नजरचुकीने अलका भाऊसाहेब दळवी असे नमुद केले या अर्जदार हिच्या कथनांमध्ये तथ्य आढळत नाही.

७) परंतू, निशाणी क्र.२२/२ वरील भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६७/२०१३ मधील निशाणी क्र. १ च्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदार क्र. ८ड म्हणून अलका भाऊसाहेब शेळके, वय – सज्ञान, असे नमुद असल्याचे दिसुन येते. परंतू, भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६७/२०१३ निशाणी क्रमांक ३/१ वर दाखल दिनांक २४/०५/२०१६ च्या संयुक्त न्यायनिर्णयामध्ये प्रस्तुत प्रकरणामधील अर्जदार हिचे नाव अलका भाऊसाहेब शेळके असे निशाणी क्र. १ वरील अर्जामध्ये नमुद असतांना संयुक्त अर्जावरील दिनांक २४/५/२०१६ रोजीचा न्यायनिर्णय पारित करतांना प्रस्तुत न्यायालयाचे पुर्वाधिकारी यांनी नजरचुकीने अर्जदार हिचे नाव अलका भाऊसाहेब दळवी असे न्यायनिर्णयामध्ये नमुद केल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर होणे आवश्यक आहे. परिणामी, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :–

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र. १ अंशत: मंजूर करण्यात येतो.
२. केवळ भूसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६७/२०१३ या दिनांक २४/०५/२०१६ रोजीच्या संयुक्त न्यायनिर्णया मधील प्रस्तुत अर्जदार हिचे नावामध्ये ''अलका भाऊसाहेब दळवी'' अशी झालेली चुक दुरुस्त करुन त्याऐवजी अर्जदार हिच्या नावामध्ये ''अलका भाऊसाहेब शेळके'' अशी दुरुस्ती करण्यात यावी.
३. प्रस्तुत अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.

SHAHIN VASIM INAMDAR
Digitally signed by SHAHIN VASIM INAMDAR
Date: 2026.08.10 17:38:27 +0530

दिनांक : १०/०८/२०२६.
अहमदनगर.

(एस.व्ही.इनामदार)
११ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
अहमदनगर.

**J.O. Code MH01987**